नि.दि.दा. क्र.३२/२०१८
उकुंडराव वि. शालीकराम
नि.क्र.६३

**वादीतर्फे सा.क्र.४ याचा अधिकचा सरतपास श्री एम.डी. पालीवाल वकील साहेबांमार्फत <u>शपथेवर सुरुः</u>**

**१.** मी माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.६३ वर दाखल केला आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला असुन तो खरा व बरोबर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री पी.एस. सायरे वकील साहेब यांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब.</u>**

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नही.**

**श्रवणोत्तर स्विकृत** **समक्ष**

**(जी.ओ. वानखडे)**
**दि.न्या. क. स्तर, पारशिवनी**

**(जी.ओ. वानखडे)**
**दि.न्या. क. स्तर, पारशिवनी**

**दिनांकः २५/०२/२०२५**

नि.दि.दा. क्र.३२/२०१८
उकुंडराव वि. शालीकराम
नि.क्र.६३ वर पुढे सुरु

**दिनांक ११/०३/२०२५ रोजी वादीतर्फे सा.क्र.०४ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री पी.एस. सायरे वकील साहेब यांचामार्फत शपथेवर सुरुः**

२. मी वर्ग ०६ शिकलो आहे. माझ जन्म १९८९ साली झाला. मी शपथपत्रातील माहिती सांगणेकरीता ऑनलाईन दुकानावर गेलो होतो. माझ्या पूराव्याचे शपथपत्र मी स्वतः तयार केले. साक्ष देण्याकामी मला न्यायालयातून समन्स प्राप्त झाला नव्हता. सदर प्रकरणात साक्ष देण्याकरीता मला कोणीही सांगितले नाही, मी स्वतः साक्ष देण्यास आलो. सदर प्रकरणात काळापाटावाले यांचे म्हणणे आहे की, शेतीची खरेदी–विक्री केली आहे. आणि खापावाले म्हणतात की, सदर शेती खरेदी–विक्रीची नसून आमची वडिलोपार्जित जमीन आहे. मी शेताचे खरेदी–विक्री पत्र पाहिले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ७/१२ उतारा पाहिला आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, शपथपत्रातील माहिती काळापाटा गावातील लोकांनी सांगितल्यावरुन मला माहित झाली. ज्या दाव्यात मी साक्ष देण्यास आलो त्याचा दावा क्रमांक सांगू शकत नाही. दावा क्रमांक माझ्या लक्षात नाही. सदर दाव्यास ९ वर्ष होत आहे. माझ्या पूराव्याचे शपथपत्र वकीलांने तयार केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीसोबत माझे चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की, शपथपत्र कसे तयार करायचे व त्यात काय लिहायचे, हे मला वादीने सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या सांगण्याप्रमाणे साक्ष द्यायची असे मला वादीने सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, खोटे पूराव्याचे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | समक्ष |
| GAJENDRA ONKARRAO WANKHADE<br>Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE<br>Date: 2025.03.11 15:53:58 +0530 | GAJENDRA ONKARRAO WANKHADE<br>Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE<br>Date: 2025.03.11 15:54:03 +0530 |
| (जी.ओ. वानखडे)<br>दि.न्या. क. स्तर, पारशिवनी | (जी.ओ. वानखडे)<br>दि.न्या. क. स्तर, पारशिवनी |

दिनांकः ११/०३/२०२५